॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥

# North Maharashtra University, Jalgaon
# उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

'A' Grade
(NAAC Re-Accredited)
3rd Cycle

पत्रपेटी क्र. ८०, उमविनगर, जळगाव- ४२५००१
दूरध्वनी क्र. (०२५७) २२५७२४८, २४९, २५३ फॅक्स क्र. २२५८४०३, ४०६

## Public Relations Office — जनसंपर्क विभाग

**बातमी क्र.१**

जळगाव दि. २३ ( ) रस्ते वाहतूकीचे नियम सर्वांना माहित असतात. मात्र बेफिकीर वृत्ती आणि घाई यामुळे अपघाताच्या संख्येमध्ये दिवसेंदिवस वाढ होत असून वाहन चालकांनी स्वत:साठी नव्हे तर कुटुंबासाठी तरी वाहन नियंत्रितपणे चालवावे असे आवाहन सातारा येथील सहाय्यक प्रादेशिक परिवहन अधिकारी योगेश बाग यांनी केले.

उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या वतीने २३ मार्च रोजी रस्ते व वाहतुकी संदर्भातील सुरक्षा या विषयावर श्री.बाग यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. यावेळी ते बोलत होते. कुलगुरु प्रा.पी.पी.पाटील अध्यक्षस्थानी होते. यावेळी मंचावर जळगावचे प्रादेशिक परिवहन अधिकारी श्री.जयंत पाटील, कुलसचिव भ.भा.पाटील उपस्थित होते.

श्री.बाग म्हणाले की, देशात गेल्या वर्षभरात झालेल्या साडे पाच लाख अपघातात दीड लाख व्यक्तींचा मृत्यू झाला. रोज जगभरात ४ हजार ४५२ व्यक्ती अपघातात मृत्यू पावत आहेत. तरी देखील अपघाताकडे कोणी गांभिर्याने पाहायला तयार नाही. आपला अपघात झाला नाही मग पुरे अशी वृत्ती वाढत चालली आहे. जगभर अपघातात मृत्यू होण्याचे प्रमाण २७ टक्के आहे. तर युध्दात मृत्यू होणाऱ्यांचे प्रमाण ३ टक्के आहे. याचा अर्थ रस्त्यावर चालणाऱ्यांना मृत्यूचा धोका अधिक आहे. सगळया जगाचे रुपांतर गॅस चेंबरमध्ये झालेले आहे. जितका रस्ता चांगला व गुळगुळीत तितके अपघाताचे प्रमाण अधिक असे सांगताना श्री.बाग यांनी पॉवर पाईंट सादरीकरणाद्वारे विविध माहिती देत हेल्मेट अत्यावश्यक असल्याचे मत नोंदवले. श्री.जयंत पाटील यांनी वाहनांचे प्रदुषण टाळण्यासाठी एकत्रित प्रवास करण्याचे तसेच दुचाकीधारकांनी हेल्मेट घालण्याचे व चारचाकी चालकांनी सीट बेल्ट लावण्याचे आवाहन त्यांनी केले.

अध्यक्षीय भाषणात कुलगुरु प्रा.पाटील यांनी विद्यापीठातील कर्मचाऱ्यांनी हेल्मेट घालणे अनिवार्य असल्याचे सांगून लवकरच आपण स्वत: तपासणी करणार असल्याचे सांगितले. वाहन चालकांनी कुटुंबाची काळजी घ्यावी असेही ते म्हणाले. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन डॉ.मुनाफ शेख यांनी केले.

---

**बातमी क्र.२**

जळगाव दि.२३ (प्रतिनिधी)- पत्रकारितेच्या क्षेत्रात भविष्यात करिअरच्या नवीन संधी उपलब्ध होणार असून ऑनलाईन मीडियाचे तंत्र विद्यार्थ्यांनी आत्मसात करणे काळाची गरज असल्याचे मत सोलापूर विद्यापीठातील जनसंवाद व पत्रकारिता विभागाचे प्रमुख डॉ.रविंद्र चिंचोलकर यांनी व्यक्त केले.

उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातील जनसंवाद आणि पत्रकारिता विभागास दि. २३ मार्च २०१८ रोजी सोलापूर विद्यापीठातील पत्रकारितेच्या विद्यार्थ्यांनी भेट दिली. यावेळी मार्गदर्शन करताना डॉ.रवींद्र चिंचोलकर बोलत होते. याप्रसंगी सोलापूरचे प्रा.मधुकर जक्कल, उमविचे डॉ.तुकाराम दौड, डॉ.सुधीर भटकर, डॉ.विनोद निताळे, डॉ.सोमनाथ वडनेरे उपस्थित होते.

माहिती तंत्रज्ञानाच्या वाढत्या विस्तारामुळे इलेक्ट्रॉनिक आणि प्रिंट मीडियामध्ये करिअरच्या नवीन संधी उपलब्ध होत आहे. या संधी मिळविण्यासाठी विद्यार्थ्यांनी डिजीटल तंत्रज्ञानाचे कौशल्य आत्मसात करणे गरजेचे असल्याचे मत डॉ.रवींद्र चिंचोलकर यांनी व्यक्त केले.

..२..

॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥
# North Maharashtra University, Jalgaon
# उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव
'A' Grade
(NAAC Re-Accredited)
3rd Cycle
पत्रपेटी क्र. ८०, उमविनगर, जळगाव- ४२५००१
दूरध्वनी क्र. (०२५७) २२५७२४८, २४९, २५३ फॅक्स क्र. २२५८४०३, ४०६

## Public Relations Office — जनसंपर्क विभाग



अभ्यासदौऱ्यात विद्यार्थ्यांनी विभागातील शैक्षणिक कामकाज आणि विविध उपक्रमाविषयी माहिती जाणून घेतली. विभागातील संगणक कक्ष, विभागीय ग्रंथालय, अध्यापन कक्ष तसेच विभागातील शैक्षणिक साहित्याविषयी माहिती जाणून घेतली. प्रास्ताविकडॉ.सुधीर भटकर यांनी केले. सुत्रसंचालन डॉ.विनोद निताळे यांनी केले तर आभार विभागप्रमुख डॉ.तुकाराम दौड यांनी मानले. त्या आधी या विद्यार्थ्यांनी कुलगुरु प्रा.पी.पी.पाटील यांची भेट घेवून त्यांच्याशी संवाद साधला. तसेच विद्यापीठाच्या जनसंपर्क विभागालाही त्यांनी भेट दिली.

---

**बातमी क्र.३**

जळगाव दि. २३ ( ) उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ कार्यक्षेत्राती काही नगरपरिषदांच्या निवडणूकांमुळे विविध विद्याशाखांच्या विविध विषयांची दि. ६ एप्रिल रोजी होणाऱ्या परीक्षा आता रविवार, दि. ८ एप्रिल रोजी होणार आहेत.

मार्च/एप्रिल, २०१८ मधील विविध विद्याशाखांच्या परीक्षांचे वेळापत्रक यापूर्वीच जाहीर करण्यात आले आहे. परंतू विद्यापीठ कार्यक्षेत्रातील काही नगरपरिषदेच्या सार्वत्रिक निवडणूका आयोजित करण्यात आल्यामुळे विद्यार्थ्यांना मतदानाचा हक्क बजावता यावा म्हणून दि. ६ एप्रिल रोजी होणाऱ्या सर्व परीक्षा रविवार, दि. ८ एप्रिल रोजी पूर्वी कळविलेल्या वेळेतच त्या-त्या परीक्षा केंद्रावर होणार असून या बदलाची नोंद घ्यावी असे आवाहन प्रभारी संचालक प्रा.ए.बी.चौधरी यांनी केले आहे.

---

जा. क्र. उमवि/१६/हस्तदेय/२०१८ — दिनांक : २३ मार्च, २०१८

प्रति,

मा. संपादक / प्रतिनिधी

कृपया, उपरोक्त बातमी आपल्या दैनिकातून प्रसिध्द करण्यात यावी, ही विनंती.

आपला विश्वासू,
स्वाक्षरीत प्रत/-
(सुनील पाटील)
जनसंपर्क अधिकारी